## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा
## आदेश क्रमांक : १९८ सन २०१९, दिनांक : १३/०९/२०१९

पहा :- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र B (Gen)-5601/57/2018/1331, दि. ३१.१०.२०१८.

उपरोक्त मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे संदर्भ क्र. १ मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या अटी व शर्ती अन्वये ह्या जिल्हाचे न्यायीक आस्थापनेवर कनिष्ठ लिपीक पदाची निवड / प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हा न्यायालय, बुलडाणा व त्या अंतर्गत दुय्यम न्यायालयातील रिक्त पदांच्या अनुषंगाने नियुक्ती बाबतचा आदेश खालील प्रमाणे पारित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | नवीन नियुक्ती व स्थळ |
|---|---|---|
| ०१ | श्री फकीरा राजाराम नरवाडे,<br>प्रतिक्षा यादीवरील उमेदवार क्र. ४३ | दिवाणी न्यायाधीश व.स्तर, मेहकर यांचे आस्थापनेवर श्री.पी.पी.मारोडे, प्रतिक्षा यादी वरील कनिष्ठ लिपीक हे रुजु न झाल्यामुळे त्यांचे रिक्त पदी कनिष्ठ लिपीक म्हणून नविन नियुक्ती. |
| ०२ | माधुरी रविंद्र खरे,<br>प्रतिक्षा यादीवरील उमेदवार क्र. ४४ | दिवाणी न्यायाधीश व.स्तर, मलकापूर यांचे आस्थापनेवर श्रीमती आर.एम.बावणे, यांचे रिक्त पदी कनिष्ठ लिपीक म्हणून नविन नियुक्ती. |

सदरहु आदेश हा दिनांक १६.०९.२०१९ चे मध्यान्हापुर्वपासून अमलात येईल.

नवनियुक्त उमेदवार यांना सुचित करण्यात येते की, त्यांची या व्दारे करण्यात आलेली नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता शासनाचे सेवेतून कमी करण्यात येईल. तसेच त्यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालयाच्या भविष्यात होणाऱ्या आदेशाला अधिन राहुन करण्यात आलेली आहे. याची त्यांनी नोंद घ्यावी.

त्यांना पुढे असेही सुचित करण्यात येते की, त्यांनी दिनांक १६.०९.२०१९ चे मध्यान्हापुर्वला आपले नियुक्तीचे पदी सोबत जोडण्यात आलेला साक्षांकन नमुना भरुन रुजू व्हावे किंवा त्यांना हा नियुक्तीचा आदेश मिळाल्यापासून ०७ दिवसाचे आत त्यांनी त्यांचे पदी रुजू व्हावे. तसे करण्यास चुकल्यास त्यांचे नाव प्रतिक्षा यादीवरुन काढून टाकण्यात येईल व त्यांचा नियुक्तीचा आदेश रद्द करण्यात येईल.

तसेच त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा स्वत:हून दयावयाचा झाल्यास ०१ महिना अगोदर तशी नोटीस अथवा त्या ऐवजी ०१ महिन्याचे वेतन त्यांना भरुन दयावे लागेल.

**पिठासीन अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, नवनियुक्त उमेदवार हे त्यांच्या आस्थापनेवर रुजू होताक्षणीच त्यांचे कडून आवश्यक ते प्रतिज्ञापन तसेच त्यांना नियुक्ती आदेशासोबत देण्यात आलेला साक्षांकन नमुना भरुन घेवून व तो संबंधीत अधिक्षक / सहाय्यक अधिक्षक यांनी तपासुन ते जिल्हा न्यायालयास पाठवावे.**

13-9-19

(महेन्द्र के. महाजन)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,
बुलडाणा.

F:\Estt\1\Estt\sanjay 1.doc

पृष्ठांकन क्रमांक /आस्था/ ३८८८ /२०१९, दिनांक १३ /०९/२०१९

प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.

०१. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, मेहकर / मलकापूर.

०२. श्री फकिरा राजाराम नरवाडे, रा. वार्ड नं. २, भिम नगर, बुलडाणा, ता.जि.बुलडाणा (नोंदणी डाकेने पोच पावतीसह).

०३. माधुरी रविंद्र खरे, रा. तांदुळवाडी, कोलवड, ता. जि. बुलडाणा. (नोंदणी डाकेने पोच पावतीसह).

०४. अधिक्षक, कार्यव्यवस्थापन / तांत्रिक विभाग, जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०५. सहाय्यक अधिक्षक, आस्थापना / वित्त व लेखा विभाग, जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०६. वरिष्ठ लिपीक वेतन देयक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०७. अध्यक्ष / सचिव, जिल्हा न्यायालयीन कर्मचारी पत संस्था, खामगांव.

०८. सहाय्यक, संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा, यांना निर्देशीत करण्यात येते की त्यांनी सदरचा आदेश वेबसाईट / ई-मेल वर टाकावा.

०९. फाईल.